७८८८
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
वा. नं. २८८/२

२०५
काव्य

...त्या...
आत्माराम मोरेश्वर पाठारे
यांनी तयार केलें.

...नंदा ॥
म. ग्रं. सं. ठाणें
सन १८८८
लेखक आ. मो. पाठारे
पुस्तकाचें नांव त्रिदिवरूपिणी
६६३
...क्रमांक

PUBLISHED

BY

**D. A. BROTHERS.**

25, *Chendnee*,

THANA.

D. A. BROTHERS

# भिल्लिणी.

—:०:—

## मंगलाचरण.

पद. राग–कानडा. ताल–त्रिवट.

स्तवूं आधिं त्या गणरायाला ॥ जन्मदा[1] ति ज्या हिमनगबाला ॥ धृ० ॥ विघ्ननाश, भव–पाश तोडि, करि ॥ देइ सदोदित सुख, शांतीला ॥ स्त०॥ चिदानंद चिद्रूप चिदंबर ॥ प्रियकर अति त्या विधिजा[2] ज्याला ॥ स्त० ॥ १ ॥

श्लोक. मंदाक्रांता.

विश्वोत्पत्ती–स्थितिलयकरे अंबिके विश्व-वंद्ये ॥ विश्वाधारे कमलनयने धांव ये, आदि-माये ॥ तारी भक्तां, दृढ पदिं तुझ्या भाव

---

१ आई. २ सिद्धिबुद्धि.

जे ठेवितातो ॥ आत्मारामें प्रथम तरि तें याचणें काय चित्तीं ॥ २ ॥

पद. राग–पिलू. ताल–धुमाळी.

बोले गिरिजा, ' सुहास्यवदना,[1] मग्न सदा ध्यानीं ॥ कांतेशीं रमणें, कां तैसा विनोद ता त्यजुनी ॥ धृ० ॥ करितां जप, तप, ध्यान, देउनी देहा कष्ट महा ॥ पतिसह जाते प्रेमें स्त्रीतें शुभ ती रात्र पहा ॥ मी तर तुमची प्रेमरसाची म्हणुनी धीटपणें ॥ प्रार्थितसें कीं, आपण दोघे खेळूं आज पणें ' ॥ बो० ॥ ३ ॥

पद. ( दूर मी झालें० या चा० )

शंकरवचना ऐकूनि सुमना नेर्दां[2] तयि मांडी ॥ धृ० ॥ डावामागें डाव सुरंगें खेळाति आनंदें ॥ निज पक्षीं गण देती साक्षी म्हणाति सुदिन अजि खास प्रमोदें ॥ शंकं० ॥ ४ ॥

---

१ शंकरा. २ सोंगट्या.

काव्य २५८/१

**अंजनीगीत.** राग–झिंजोटी. ताल–धुमाळी.

इतुक्यामाजी कलि लावाया ॥ नारद आला त्या शिव-ठाया ॥ खेळति दोघें शिव, तत् जाया ॥ पाहुनि काय वदे ॥ १ ॥ 'गिरिजे, कांहीं पण मांडुनियां ॥ ससाक्ष पतिशीं खेळ समयि या ॥ पणावांचुनी गोडी नये या ॥ नच आ-वेश मुळीं' ॥ २ ॥ ५ ॥

**पद.** राग–झिंजोटी. ताल–त्रिवट.

वृष[1], डमरू, पिनाकातें, शिव चंद्रा मां-डिती ॥ परि नगजा हरित त्यांतें, दश अयुधें तेविं तीं ॥ मुनि बोले हांसुनी त्या तयिं 'कां हो पशुपती ॥ ह्या अबला, नवल वाटे रणिं सबलां[2] पाडिती' ॥ ६ ॥

**श्लोक.** रागिणी–भैरवी.

'सांबा जेथें स्त्रियेचें प्रबलपण तिथें धि-

---

१ नंदी. २ वीराला.

ग्जिणें त्या नराचें ॥ नाहीं संगें तयाच्या सुखचि परजनां, चित्त त्याचें न रंचे ॥ जावें येथूनि ऐशा समयिं तरि बरें, राहतां क्षीण-मान ॥ होतो; अह्मां न सोसे, शिव, तुजाहे असे ठाउकें वर्तमान ' ॥ ७ ॥

**पद.** राग—काफी. ताल—दीपचंदी.

धूर्ती अजय ह्मणोनी ॥ गेला भव मुनि-वाक्यें खवळुनि ॥ धृ० ॥ क्रोधभरानें अ-रक्तनेत्रें बोले तो गिरिजेशीं ॥ ' लाज, वि-नय, तुज नच मर्यादा, ॥ ह्मणुनी जातों मी घोर वनीं ' ॥ धूर्ती० ॥ ८ ॥

**साकी.** राग—जोगी. ताल—धुमाळी.

निघतां वनवासातें कौलिस[2] वदे भीतिभतव[3]-कानें ॥ ' माझी पुनरागमन सुवार्ता ऐकावि न तव कानें ' ॥ ऐसें बोलोनी ॥ जाता झाला घोर वनीं ॥ धृ० ॥ ९ ॥

---

१ रंजे. २ पार्वतीस. ३ भयंकर भावानें.

माल्या २०६

**पद.** ( नाहिं सुभद्रा० या चा० )

शिव पार्वतिला त्यागुनि गेला तयिं गिरि-वरजा[1] ती ॥ जलावांचुनी जाय सुकोनी जशि सुमवरजाती[2] ॥ धृ० ॥ हरसंयोग— प्रचुरसुखांबुवांचुनि[3] तशि आर्या ॥ धाय मोकलुनि बोले सति ती, 'हा नाथा आर्या, ॥परबुद्धीला लागुनि कैसी त्यजिली प्रिय भार्या' ॥ आत्माराम वदे, तव त्याला शोधक ती भक्ती ॥ शि० ॥ १० ॥

**पद.** राग—खमाज. ताल—पंजाबी ठेका.

जातां काननिं तो शिव भोळा ॥ शोक करी बहु हिमनगबाला[4] ॥ धृ० ॥ फेंकुनि दूरी पुष्पहार ते, स्फुंदत स्फुंदत म्हणे सखीला ॥ जातां० ॥ 'खळ मांडिला सहज विनोदें,

---

१ पार्वती. २ पुष्पांमध्यें श्रेष्ठ, अशी जी जाई. ३ शिवसंयोगापासून जें अत्यंत सुख, तच अंबु म्हणजे पणी, त्यावांचून. ४ पार्वती.

नारद परि तैं कोठुनि आला ॥ जातां० ॥ साळीभोळा[1] जिवलग माझा, लावुन त्यानें दिला चढीला[2] ॥ जा० ॥ टाकुनि गेला प्रियकर सखये, विरहाग्नी हा देहिं चेतला' ॥ जातां० ॥ ११ ॥

पद. ( व्यर्थ मी जन्मलें० या चा० )

'हार हा सर्पची भासतसे ॥ अंतरिं चैन मुळींच नसे ॥ धृ० ॥ कोमलांग हें अनंग माझें, निर्दय जाळितसे ॥ हार० ॥ असति राहिले अजुनी देहीं, प्राण मदीय कसे' ॥ हार० ॥ १२ ॥

पद. (आम्रमंजरी तुला० या चा० )

'विरहाची जाचणी किती तरि, सांगु तुह्मां साजणी ॥ धृ० ॥ चंद्रकलांनीं[3] दग्ध तनू

---

१ साधाभोळा. २ क्रोधाच्या उत्तेजनाला. ३ चंद्राच्या किरणांनीं.

हीं, काय करूं करणी ॥ सख्यांनो ॥ का०॥ पीकवाणि ही कंटक जेवीं, वेध करी कर्णीं[1] ॥ सख्यांनो ॥ वेध० ॥ निशिदिनीं मजला चैन पडेना, कशि करुं मनधरणी[2]?' ॥ सख्यांनो ॥ कशि०॥ १३॥

पद. (आले वनमाळी रात्रीं ० या चा०)

'प्रियावीण काय करूं या अशा निकेतनीं[3] ॥ अहोरात्र करित अहा! वियोगाग्नि दाह मनीं ॥ ध्रु० ॥ अलंकार, सुमनहार, दूर करा साजणी ॥ कालरूप त्रास करी वैरिणि ही यामिनी[4] ॥ प्रिया० ॥ दिशा धुंद, चित्त कुंदे[5], बिंदु सदा लोचनीं ॥ जीवत्याग हाच बरा व्यर्थ काय वांचुनी' ॥ प्रिया०. ॥ १४ ॥

पद. (उरला भेद० या चा०)

ऐसें बोलुनि स्वसख्यांशीं ॥ विव्हल हो-

---

१ कानांत. २ मनाचें आवरण. ३ घरांत. ४ रात्र. ५ असंतोषित.

उनि गुणराशी ॥ धृ० ॥ मूर्छित भूवरती पडली ॥ झंझावातें जाशी कदली ॥ देहीं शक्ति तिच्या नुरली ॥ शोकें व्याकुळ बहु झाली ॥ वदति सख्या, 'हे नगबाळी[1], ॥ शोका त्यजुनी ये वेळीं ॥ चाल ॥ ऊठ ऊठ, हे गिरिवरनंदिनि[2], धुंडुं वनीं त्याशीं' ॥ उठली सति ती त्यासरशी ॥ ऐसें० ॥ १९ ॥

**दिंडी.** राग–कानडा. ताल–दादरा.

चालली ती एकली काननासी ॥ आपुला तो प्रियसखा शोधण्यासी ॥ भेटतां तिज तेथून कुणी जातां ॥ प्रश्न करि, 'का पाहिलें प्राणनाथा?' ॥ १६ ॥

**पद.** राग–बेहाग. ताल–दादरा.

'भस्मोद्धूलित[3] ज्याचा काय तो असे ॥ निशिदिनिं मुनि, सुर, नर, पद वंदिती तसे ॥

---

१ पार्वती. २ पार्वती. ३ भस्मचर्चित.

धृ० ॥ मस्तकिं बहु जटाभार ॥ विलसे मधिं रुचिर नार ॥ रामव्यास ज्यास फार ॥ जाळियला ज्यानें स्मर ॥ तापसिजनिं, जो स्मशानिं नित्यची वसे ' ॥ भस्मो० ॥ १७ ॥

पद. राग–लिलांबरी. ताल–दादरा.

गिरिजा तयिं हा विचार आणि कीं, मनीं ॥ वंचकरूपांतर तें योग्य मानुनी ॥ धृ० ॥ ' जरि जाइन सन्निध मी ऐशि ये क्षणीं ॥ झिडकारिल मजला त्रिपुरारि पाहुनी ॥ यास्तव भुलवीन त्यास खास, होऊनी ॥ भिल्लिणि,' ती वदुनि असें जात काननीं ॥ गिरिजा० ॥ १८ ॥

पद. (अजि अक्रुर हा० या चा०)

मग उफराटे केश सर्व बांधोनी ॥ वनकुसुमें वरि लेवोनी ॥ भरि मळवट तो भाळीं दोन्हि करांनीं ॥ कज्जल तें नेत्रीं दोनी ॥

१ सुंदर.

चाल ॥ करिं कंकणपंक्ती खळखळते ॥ चरणांत वाजती पैंजण ते ॥ चाल ॥ कंचुकि उलटी, कच्छ, निऱ्या फिरवोनी ॥ भिल्लिणि ती बनली तरुणी ॥ १९ ॥

**साकी.** राग–पिलू. ताल–धुमाळी.

स्वच्छंदानें रानिं भिल्लिणी राग आळवी जोगी ॥ गिरिकंदरिं त्या मधुर रवानें लटपटला तो जोगी ॥ २० ॥

## गोपीगीत.

मग ह्मणे, 'नको बंदिवास हा ॥ व्यर्थ, व्यर्थ, हें तप असें महा ॥ स्थान शिघ्र हें त्यजुनि सत्वरी ॥ नयनिं पाहुं या सुंदरी तरी' ॥ २१ ॥

**पद.** ( पंचतुंड नर० या चा० )

ऐसें बोलुनि त्यजुनि गुहा ती भिल्लिणि

१ शंकर.

 काव्य

गात जिथें होती ॥ सन्निध तीच्या प्राप्त जाहला, परी तन्मनीं ही भ्रांती ॥ 'स्वर्गिंहुनी ऊर्वशी, मेनका, आलि काय या घोर वनीं ॥ दुर्गास्थालें ही सुदीर्घनयना[1] वाटे मजला योग्य मनीं' ॥ ऐसें० ॥ २२ ॥

**अंजनीगीत.** राग—झिंजोटी. ताल—धुमाळी.

अपुल्या गानें वेध पावला ॥ जप, तप, ध्याना, सोडुनि आला ॥ जाणुनि ऐसें ती नगबाला[2] ॥ काय पहा करिते ॥ २३ ॥

**साकी.** राग—पिलू. ताल धुमाळी.

खोव्या वेषें, चमके तोषें, घाडें घाडें त्याला लक्षी ॥ स्वपतीलागीं भुलवि केशांगी, भरली त्याचे लक्षीं[3] ॥ १ ॥ चालुनि पुढतीं परतुनि मागें नेत्रकटाक्षें त्यातें ॥ क्षणोक्षणीं ती पाहे युवती भेदी हृदयनगातें[4] ॥ २ ॥२४ ॥

---

१ विशाळ आहेत डोळे जिचे. (भिल्लिणी.) २ पार्वती. ३ ध्यानांत. ४ हृदय हाच एक पर्वत, त्यातें.

**पद.** राग–मालकंस. ताल–त्रिवट.

'तन्वि[1], शुभांगे, कवण तुं असशी ? ॥
चित्तोत्सव[2] हा क्रीडाया मम धांव घेइ अनिवार सांग या समयीं तूं मजशीं ॥ धृ० ॥
मज वाटे तप फळलें तुझिया दर्शनमात्रें सुखकर तरुणी[3], ॥ कामोदधि[4] तरण्यास्तव त्यागुनि लाज, तरणि[5] होई मजशीं' ॥ तन्वि०
॥ २५ ॥

**पद.** राग–भूपकल्याण. ताल–दादरा.

'मधुवचनें बोलुन मज काय भुलवितां ?॥
त्यजुनि नीति भलभलतें काय बोलतां ?॥ धृ०॥
सकल जनांचे गुरुवर अपण दीसतां ॥ मग समजे नच का परकीय योषिता ?' ॥ मधु०
॥ २६ ॥

**पद.** राग–झिंजोटी. ताल–त्रिवट.

'विवाहित, कीं नाहीं ? किंवा असशी

---

१ कृशांगे. २ चित्ताचा आनंद. ३ तरुण स्त्रिये. ४ मदनरूपी समुद्र. ५ नौका.

तूं सत्कृता, ? ' ॥ ' पति मातें असुनि कां हो भलतें हें याचितां ? ॥ संकट कां आपणांतें ओढुनियां आणितां ? ' ॥ स्मर बोले, ' न भी, काळा दंडिन मी तत्वेंतां ' ॥ वि० ॥ २७ ॥

**पद.** ( मध चलत कान० या चा० )

' तूं असुनि फार सकुमार अशा वयिं ॥ असु० ॥ विलास—अभिरुचि–अनुभव किंचित नाहिं जाहला तव हृदयीं ॥ धृ० ॥ तूं०॥ म्हणुनि तुवां गुरु हाचि करावा ॥ रतिसुखशयनीं अनुभव घ्यावा ॥ करि विचार हा या समयीं ' ॥ तूं असुनि० ॥ २८ ॥

**पद.** ( कोन गली गये श्याम. )

' येथुनि जा आतां ॥ स्मरहरा ॥ धृ० ॥ पतिव्रतांवर दृष्टि वांकडी ॥ सूज्ञ असुनि धरितां ॥ स्मर० ॥ नयेच माझ्या गोष्ट मनीं

---

१ वारांगनाश्रेष्ठ. २ निश्चयें.

ही ॥ आग्रह कां कारितां ॥ स्मर० ॥ नि-र्दय कपटी जात नराची ॥ वश कामापुरता' ॥ स्मर० ॥ २९ ॥

**पद.** ( देवस्त्री मेनका० या चा० )

' क्षणभर आशा पुरवुनि मग तूं भजशि अन्य स्त्रीतें ॥ किंवा त्यागुन जाशिल मज, मनिं शंका ही येते ॥ त्रिपुरसुंदरी, चिरा[1], गु-णवती, कां अप्रिय तूतें ? ॥ इच्छिशि मज, भक्षावीं जेवीं लोशनें[2] किं तूतें[3] ' ॥ ३० ॥

**साकी.** राग-जोगी. ताल-धुमाळी.

' तृषार्तासि तें सत्वर द्यावें जेवीं शीतल पाणी ॥ अर्पी तैशी शुभ तनु अपुली, विपरित कां तव वाणी ? ॥ अंतर हा तरुणी ॥ कधिं नच दे-इल जाण मनीं ' ॥ धृ० ॥ ३१ ॥

---

१ लावण्यवति. २ अमृत प्राशन करणारानें. ३ तुताचीं फळें.

**पद.** ( मी तप्त जरी० या चा० )

' कां इतुकी ही घाइ मनीं, धीर कीं धरा॥
केला अजि मी स्विकार तूमचा खरा ॥ धृ० ॥
शोधित गिरिजा येइल आपणां इथें ॥ परि,
हा विचार हृदयिं आधिं ईश्वरा करा' ॥३२॥

**दिंडी.** राग–लिलांवरी. ताल–दादरा.

बोल सारे ऐकून न त्या कालीं ॥ अलि-
गुन पाहे, भिल्लिणी न, काली[1] ॥ तदांघ्रीयुगि[2]
चंडिका भाल ठेवी ॥ वदे शिव, ' तूं हे धन्य!
धन्य! साध्वी' ॥ ३३ ॥

**पद.** ( जीं जीं कर्मे० या चा० )

' संसृति–पाशीं[3] टाकिलेंस तूं युक्तीनें म-
जला ॥ कुशल अती तूं मनोरंजने, कीर्ति
तुझी विमला ॥ धृ० ॥अद्भुत आणुनि सोंग

---

१ पार्वती. २ शंकराच्या दोन्ही पायांवर. ३ संसार–पाशांत.

आमुचा राग तुं दवडीला ॥ कृत्रिम करणें
सुरंग जाणाशि, न दिसे व्यंग मला ॥ माग
कांहि वरदान, देतसें इच्छित मी तुजला' ॥
सुहास्यवदनें वदे अपर्णा, 'इतुकें द्याजि
मला- ॥ नच व्हावा कधिं वियोग अपुला
मजशिं कालकोला—' ॥ 'तथास्तु' बोलुनि
धरुनि तिचा कर, हर स्वगृहिं गेला ॥ सं०
॥ ३४ ॥

समाप्त.

---

१ चांगलें. २ शंकरा.

# ग्रंथकर्त्याची ईश्वरास प्रार्थना.

———:००———

पद. राग-भूप. ताल-त्रिताल.

पावना, हें मन तल्लिन होवो सतत तुझ्या चरणां ॥ धृ० ॥ योगीमानसपद्ममिलिंदा, प्रमोदकंदा, बहु छंदा ॥ पुरवुनि, देशी हे नगवासी, भक्तजनांशीं, मुनिवृंदा ॥ अंतीं मुक्ती, धृति तोवें अती, सन्मति ती त्या मतिमंदा ॥ देशी तूं, त्रस्तजनां अभया दीना, त्रीनयना ॥ १ ॥ सुकाव्य सुमनीं, दृढभाव मनीं धरुनी, जनमनविश्रामा ॥ करितों पूजन, प्रिय होवो, मुग्धावनिताप्रघटितकामा ॥ मोरेश्वरसुत आत्मा-रामा, गिरिवरजानयनाऽरामा ॥ दे, सदया, सौख्य; तरी जगदाभरणा, तोष मना ॥२॥

———

# विक्रीस तयार.

| | किंमत. आ० | पै. |
|---|---|---|
| लेखावर मेख................................ | १ | ० |
| महानंदा ................................ | १ | ० |
| भिल्लिणी ................................ | १ | ० |
| हिंदुस्थानांतील शेतकीचें निकृष्ट स्थितीविषयीं विवेचन................................ | १ | ० |
| आरोग्यसार. (सहावे इयत्तेचे परिक्षेस जाणाऱ्या विद्यार्थ्यांकरितां)............ | ० | ६ |
| सुरापान निषेध ................................ | ० | ६ |

---

## तयार आहे.

संगीत

## वसंत—इंदिरा नाटक. (पंचां

(प्रयोग करण्यास योग्य व सुलभ.

**किंमत १२ आणे. ट० हा० १ अ**

सूचना.—दहा प्रती घेणारास एक प्रत क
खल मिळेल. पुस्तक मुंबईतील
बुकसेलर्स यांच्या दुकानीं, व
खालील पत्त्यावर विकत मिळेल.
पुस्तकेंही दोन्ही ठिकाणीं विकत

पत्ता:—डी० ए० ब्रदर्स. } **प्रका**
२९. चेंदणी, ठाणे.

नं. 2
विषय
का।
संग्रहालय
2